**कार्यालय जिल्हा परिषद यवतमाळ**

**शिक्षण विभाग (माध्यमिक) जि.प. यवतमाळ**

**क्रमांक/यजिप/शिवि/आम. खास निधी/** 444 **/2025 दिनांक** 05/01/2025

शिक्षण विभाग (माध्यमिक) जिल्हा परिषद यवतमाळ अंतर्गत आमदार / खासदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत खाजगी शाळांना **वाटर कुलर 230 लिटर /100 LPH चे** R.O. या योजनेच्या ही योजना आमदार / खासदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत सन 2024-25 या आर्थिक वर्षात राबविण्याच्या अनुषंगाने अधिकृत पुरवठा धारकाकडुन (ISI प्रमाणित दर्जा प्राप्त असलेल्या कंपन्या अथवा त्यांचे मुख्य अधिकृत पुरवठादार) मोहोरबंद दरपत्रक दोन लिफाफे पध्दतीने मागविण्यात येत आहे.

| **अक्र.** | **तपशिल** | **नग** | **खरेदीची अंदाजित किंमत** | **एकुण रक्कम** |
|---|---|---|---|---|
| १ | **वाटर कुलर 230 लिटर /100 LPH चे** R.O. | 2 | 190000/- | 380000/- |

**दरपत्रकची माहिती खालील प्रमाणे आहे.**

1) निविदा धारकाने दर नमुद करतांना प्रती नगाप्रमाणे सर्व प्रकारचे कर (महाराष्ट्र विक्रीकर व अबकारी करासह) व इतर खर्च जसे पॅकींग, भराई व उतराई, जेथे जकात कर लागु असेल तेथे जकात कर विचारात घेऊन प्रपत्र अ मध्ये नमुद केल्यानुसार नमुद करावे तसेच अ मधील नमुद दरात कोणतीही खाडाखोड/गिरावट कटाक्षाने टाळण्यात यावी. 2) दरपत्रकाचे माहोरबंद लिफाफे शिक्षण विभाग माध्यमिक (जि.प. यवतमाळ) येथे दिनांक 12/01/2025 रोजी पर्यंत सादर करावे.
2) सदरची कोटेशन दिनांक 11/01/2025 रोजी दुपारी ३:०० वा. उघडण्यात येईल.
3) तांत्रिक लीफाफा क्र. 1 व व्यापारी लीफाफा क्र. 2 बाबत सविस्तर माहिती सोबत जोडली आहे तसेच पुरवठा करण्यात येणाऱ्या साहीत्याचे दरपत्रकाबाबत Schedule C व अटी शर्ती सोबत जोडले आहे.
4) सदर कागदपत्रे बाबत पुर्तता न झाल्यास कोटेशन अवैध ठरविली जाईल.
5) उपरोक्त कागदपत्र सादर करण्यास कोणतीही वाढीव मुदतवाढ अथवा सवलत दिली जाणार नाही.
6) केंद्र/राज्य किंवा जिल्हा परिषदेच्या सेवेशी संलग्न किंवा अप्रत्यक्ष संबंधित असलेल्या कोणत्याही इसमाकडुन दरपत्रक स्विकारली जाणार नाही.
7) कोणतीही दरपत्रक अथवा सर्व दरपत्रक कोणतेही कारण न देता नाकारण्याचे संपुर्णतः अधिकार खालील स्वाक्षरी करणाऱ्यांनी राखुन ठेवलेला आहे.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद यवतमाळ

**"आमदार/ खासदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत खाजगी शाळांना संगणक व इतर साहित्य पुरविणे या**

**योजनेच्या लिफाफा क्र १ व २ मध्ये आवश्यक कागदपत्राची माहीती दोन लिफाफे पध्दतीतील पहीला लिफाफा तांत्रिक निविदेचा असेल व दुसरा लिफाफा व्यापारी किंवा दरासंबंधीचा असेल.**

**अ) लिफाफा क्र १ यात खालील कागदपत्राचा समावेश असणे आवश्यक आहे.**

1) अधिकृत उत्पादक असल्याबाबचे प्रमाणपत्र तसेच अधिकृत पुरवठा धारक असल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. (प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडावी)
2) शॉप ॲक्ट नुसार दुकान नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.
3) वित्तीय वर्ष 2023-24 चे आयकर
4) दिनांक 31/03/2024 अखेर पर्यंत GST चा भरणा / विक्री कराचा क्लिअरन्स सर्टीफिकेटची प्रत. अथवा विक्रिकर भरण्यापासुन सुट मिळाली असल्यास अशा अर्थाचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र (तपशिल दयावा व कागदपत्र जोडावी.)
5) पॅन कार्डची प्रत
6) GST No ची प्रत.
7) पुरवठा करण्यात येणाऱ्या साहीत्याचे संदर्भात सुटे भाग व पुरवठा पश्चात सेवांचे ठिकाण हया संदर्भातील तपशिल जोडणे आवश्यक आहे.
8) निविदाधारक Black Listed नसल्याबाबतचे प्रमाणपत्र
9) संस्थेबाबत नोंदणीचा दाखला असणे आवश्यक आहे. तसेच सहकारी संस्थेबाबत उपविधीची प्रत, भागीदार संस्था असल्यास पार्टनरशिप डिडची प्रत जोडावी.
10) भारतीय मानक चिन्हांकीत ( ISI Mark) मिळालेल्या प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
11) क द्र/राज्य किंवा जिल्हा परिषदेच्या सेवेशी संलग्न किंवा अप्रत्यक्ष संबंधित नसल्याबाबत प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

**ब)** लिफाफा क्र २ - व्यापारी दरासंबंधिचा लिफाफा हया लिफाफ्यामध्ये निविदाकाराने स्वतः साठी खरेदी केलेले व

स्वतः सही करुन साक्षांकित केलेले सर्व समाविष्टित दर दर्शविणारे विहीत निविदा प्रपत्र अ फॉर्म सादर करावेत. सदर प्रपत्राव्यतिरिक्त कोणत्याही अटी शर्तीचा तपशिल असणारे अथवा सुट बाबत सुचनांचा उल्लेख असणारे कागदपत्रे सादर करु नयेत. विहीत दरपत्रकावरच पुरवठाधारकाचे दर नमुद करावे अन्य कोणत्याही कागदपत्रावर दर्शविलेले दर विधीग्राहय समजले जाणार नाही. सदर नमुद केलेले दोन्ही लिफाफे स्वतंत्रपणे मोहोरबंद करावे व त्यावर तांत्रिक निविदेचा लिफाफा क्र १ व्यापारी दरासंबंधीचा लिफाफा क्र २ असा उल्लेख करावा. त्यानंतर सदरचे दोन्ही लिफाफे तिसऱ्या एका मोठया लिफाफ्यात एकत्र घालुन तोही लिफाफा मोहोरबंद करावा हया लिफाफ्यावर निविदा काराने त्याचे पुर्ण नाव व पत्ता नमुद करावा व लिफाफा कार्यालयात सादर करावा.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद यवतमाळ

**आमदार/ खासदार स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत खाजगी शाळांना वाटर कुलर 230 लिटर /100 LPH चे R.O. या योजनेच्या अटी व शर्ती**

१) अधिकृत उत्पादक असल्याबाबचे प्रमाणपत्र तसेच अधिकृत पुरवठा धारक असल्याचे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. (प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडावी)

२) शॉप ॲक्ट नुसार वैध दुकान नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

३) सन 2023-24 अखेर पर्यंत GST चा भरणा / विक्री कराचा क्लिअरन्स सर्टीफिकेटची प्रत अथवा विक्रिकर भरण्यापासुन सुट मिळाली असल्यास अशा अर्थाचे सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र ( तपशिल दयावा व कागदपत्र जोडावी.)

४) संस्थेबाबत नोंदणीचा दाखला असणे आवश्यक आहे. तसेच सहकारी संस्थेबाबत उपविधीची प्रत, भागीदार संस्था असल्यास पार्टनरशिप डिलची प्रत जोडावी.

५) भारतीय मानक चिन्हांकीत (ISI Mark) मिळालेल्या प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

६) ज्या दरपत्रकात दर दिलेले नसतील अथवा दिलेल्या दरपत्रकात संदिग्धता असेल अशी निविदा नाकारली जाण्यास पात्र ठरेल. दर हे अक्षरी व अंकात देण्यात यावी. जर अक्षरी व अंकातील दरात तफावत असल्यास त्यापैकी जे दर कमी असेल ते दर विचारात घेतल्या जाईल आणि सदरचा कमी दर पुरवठाधारकास बंधनकारक राहील.

७) निविदा धारकाने दर नमुद करतांना प्रती नगाप्रमाणे सर्व प्रकारचे कर (महाराष्ट्र विक्रीकर व अबकारी करासह) व इतर खर्च जसे पॅकींग, भराई व उतराई, जेथे जकात कर लागु असेल तेथे जकात कर विचारात घेऊन प्रपत्र अ मध्ये नमुद केल्यानुसार नमुद करावे तसेच अ मधील नमुद दरात कोणतीही खाडाखोड / गिरावट कटाक्षाने टाळण्यात यावी.

८) लिफाफा क्र १ मधील प्रमाणपत्रे व इतर कागदपत्रे अपुर्ण आढळल्यास लिफाफा क्र २ (दरासंबंधिचा लिफाफा) न उघडण्याचा निर्णय अबाधित आहे.

९) निविदा धारकांनी सादर केलेले दर हे निविदा उघडण्याच्या दिनांकापसुन 31 / ०1 / 2025 पर्यंत विधीग्राहय राहतील. एकादा स्विकृत केलेल्या दरात कोणतीही वाढ अनुज्ञेय राहणार नाही.

१०) केंद्र / राज्य किंवा जिल्हा परिषदेच्या सेवेशी संलग्न किंवा अप्रत्यक्ष संबंधित असलेल्या कोणत्याही इसमाकडुन निविदा स्विकारली जाणार नाही.

११) निविदा स्विकृत झाल्यनंतर निविदाधारकास अटी व शर्ती न्यायालयीन मुद्रांकावर ( Stamp paper ) रितसर करारनामा करुन द्यावा लागेल. करारनाम्यातील अटी व शर्तीत कोणताही बदल अथवा नविन अटी व शर्तो समाविष्ट करण्याचा अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प.यवतमाळ यांनी राखुन ठेवला आहे.

१२) निविदेतील परिमाण (Quantity) अंदाजित असुन पुवरठा करावयाच्या साहीत्य मार्च मध्ये तरतुदीमध्ये कपात किंवा वाढ केल्यास त्यानुसार राहील.

१३) साहीत्याची गुणवत्ता (Quality) या निविदेसोबत प्रपत्र अ मध्ये दिलेल्या वर्णणानुसारच असावी तसे नसल्यास साहीत्य स्वीकृत केले जाणार नाही.

१४) साहीत्याचा पुरवठा निविदेतील वर्णणानुसार करावा लागेल. त्याचप्रमाणे पुरवठा केलेले साहीत्य हे सुस्थितीत असावे तसे न आढळ्यास स्वखर्चाने परत न्यावे लागेल त्याबाबत कोणतीही तक्रार विचारात घेण्यात येणार नाही.

१५) पुरवठा आदेशात सोबत असलेल्या पुरवठा वेळा पत्रकानुसार आदेशाचे दिनांकापासुन निर्धारित केलेल्या ठिकाणी पुरवठा करावा लागेल मात्र परिस्थितीनुरुप अपरिहार्य कारणास्तव पुरवठा वेळा पत्रकात बदल करण्याचे अधिकार शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. यवमाळ यांनी राखुन ठेवला आहे.

१६) साहीत्याचा पुरवठा विहीत कालमर्यादेत न झाल्यास शासन नियमानुसार दंड आकारण्यात येईल किंवा पुरवठा आदेश रद्द करण्याचे अधिकार शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. यवमाळ यांचेकडे राखून ठेवण्यात येत आहे.

१७) जर कसुरवार पुरवठा धारकाने वसुली योग्य रकमेचा भरणा केला नाही तर त्याचे नाव काळया यादीत समाविष्ट केल्या जाईल व जिल्हा परिषदेच्या पुढील कोणत्याही खरेदीच्या वेळी निविदास्पर्धेत भाग घेण्यास मनाई करण्यात येईल.

१८) साहीत्याची तपासणी शासकिय संस्थेकडुन करण्यात यावी व तपासणी करण्याचा खर्च संबंधित पुरवठादारास
करावा लागेल.

१९) साहीत्याची वारंटी १ वर्ष असणे आवश्यक आहे.

२०) पुरवठा कालावधीत साहीत्यची भाववाढ झाल्यास कोणतीही भाववाढ देय राहणार नाही.

२१) पुरवठादार कोणत्याही शासकिय/निमशासकिय कार्यालयाकडुन Black Listed झालेला नसावा. तसेच पुरवठा निविदा प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर Black Listed असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांचेवर नियमानुसार कार्यवाही करण्यात येईल.

२२) प्रमाणित साहीत्याचा पुरवठा संबंधित कार्यालयास पुरवठाधारकाने केल्यावरच पुरवठा केलेले साहीत्य विनिर्देशित व चांगल्या प्रतीचे प्राप्त झाल्याचे शाळेचे मुख्याध्यापाक / प्राचार्य यांचे प्रमाणपत्रासह पोचपावती सादर केल्यानंतरच देयकाची रक्कम अदा केल्या जाईल.

२३) निविदेतील अटी व शर्ती याबबत कोणताही वाद निर्माण झाल्यास शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प. यवतमाळ यांचा निर्णय अंतिम राहील व तो पुरवठा धारकास बंधनकारक राहील.

२४) रारासंबधी पुरवठा धारकाकडुन काही घेणे निघाल्यास ते त्यांना देय असलेल्या करमेतुन वा इतर मार्गानी महसुलाची थकबाकी म्हणुन वसुल करण्यात येईल.

२५) निविदेतील नमुद केलेले दर आर्थिक वर्ष 2024-25 साठी दिनांक 31/ 01 / 2025 पर्यंत ग्राहय समजण्यात येतील.

२६) साहीत्य खरेदी प्रकरणात काही वाद निर्माण झाल्यास न्यायालयीन मर्यादा यवतमाळ राहील.

२७) उपरोक्त नमुद शर्ती/ अटी बाबत पुरवठा धारकास शंका अडचणी असेल तर त्याबाबत अधिक माहीती क कार्यालयात विचारून किंवा प्रथम खुलासा घेऊनच दराचे विविरण पत्र सादर करावे. निविदा उघडतेवेळी उपस्थित केलेल्या तांत्रिक मुद्याबाबत पुरवठा धारकाचे लेखी/तोंडी निवेदन किंवा तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

२८) पुरवठा करण्यात येणा-या साहीत्यात कोणत्याही प्रकारची त्रुटी असणे, गुणवत्तेपेक्षा कमी प्रतीचा माल देणे निर्धारित मुदतीत मालाचा पुरवठा न करणे इत्यादी कारणाने कोणत्याही प्रकारची तक्रार, गडबड, गोंधळ निर्माण झाल्यास संबंधित पुरवठाधारक हे सर्वस्वी जबाबदार राहील.

२९) पुरविलेल्या साहीत्य या गुणवत्तेपेक्षा कमी दर्जाचे अथवा खराब किंवा मोजमापानुसार नसतील व तसे संबंधितांनी पुरवठा धारकास कळविल्यास १५ दिवसाच्या आत साहीत्य बदलवुन देणे पुरवठाधारकास बंधनकार राहील.

३०) निर्धारित ठिकाणी साहीत्य पुरवितांना वाहतुकीत साहीत्याची काही तुटफुट झाल्यास झालेल्या नुकसानीची संपुर्ण जबाबदारी पुरवठाधारकाची राहील.

३१) साहीत्याचे अगाऊ देयक कोणत्याही परिस्थितीत मान्य करण्यात येणार नाही.

शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद यवतमाळ